# भाजपकडून विधानपरिषदेसाठी 30 नावं केंद्रीय भाजपकडे

**मुंबई |** महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या १० जागांच्या निवडणुकीसाठी भाजपनं पाठवेलली नावे पुढील प्रमाणे : माधवी नाईक, डॉ. उपेंद्र कोठेकर, मनोज कोटक, केशव उपाध्ये, रवी अनासपुरे, राजेश पांडे, दयाशंकर तिवारी, राम सातपुते, रणजितसिंह निंबाळकर, संजय काका पाटील, विवेक कोल्हे, जगदीश मुळीक, प्रमोद जठार, संजय केणेकर, अर्चना पाटील चाकूरकर, दादाराव केचे, संजय भेंडे, संदीप जोशी अशी नावं यादीत असल्याची सूत्रांची माहिती आहे.


दैनिक **हिंदू प्रकाशवार्ता**

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



पाहिजेत

श्री VARAD CONSTRUCTION

सिव्हिल इंजिनिअर, डिझाईन व स्ट्रक्चरल पाहिजे

shrivaradconstructionco@gmail.com

संपर्क : 7261999911



छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


# प. बंगालमध्ये 92 तर तामिळनाडूत 85 टक्के विक्रमी मतदान!

**कोलकाता / चेन्नई |** पश्चिम बंगालमधील निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात, ज्यामध्ये २९४ पैकी १५२ मतदारसंघांमध्ये मतदान झाले, तिथे तुरळक हिंसाचाराच्या घटनांची नोंद करण्यात आली. मुर्शिदाबादमध्ये तृणमूल काँग्रेस आणि 'आम जनता उन्नयन पार्टी' च्या कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष उफाळून आला. यावेळी कथित कार्यकर्त्यांनी हुमायून कबीर यांच्या गाडीची तोडफोड केली. मतदानादरम्यान हुमायून कबीर यांनी बंगालमधील बाबरी मशीद स्थळालाही भेट दिली. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार पश्चिम बंगालमध्ये सुमारे ९१.७८ टक्के विक्रमी मतदान झाल्याने सर्वांचे लक्ष आता निकालाकडे लागले आहे. ४ मे २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे वाढलेली मतांचे टक्केवारी कोणाच्या फायद्याचे ठरते हे उघड होणार आहे.



ममता बॅनर्जी यांनी मतदानानंतर म्हटले की, 'जनतेने मोठ्या संख्येने मतदान करून विरोधकांना उत्तर दिलं आहे.' तर विरोधकांचा दावा आहे की, राज्यात आता सत्तांतर निश्चित आहे.

**ऐतिहासिक रेकॉर्ड ब्रेक मतदानाचा अर्थ काय? |**

राजकीय तज्ज्ञांच्या मते, जास्त मतदानाचा अर्थ अनेक असू शकतो सत्ताविरोधी लाट . सत्ताधाऱ्यांना पाठिंबा ,तीव्र राजकीय ध्रुवीकरण पश्चिम बंगालमध्ये हे तिन्ही घटक सक्रिय असल्याचे दिसत आहे.

दक्षिण दिनाजपूरमध्ये भारतीय जनता पक्षाचे उमेदवार शुभेंदू सरकार यांना कथितरित्या ऊश्ण् कार्यकर्त्यांनी मारहाण केली. एका कथित व्हिडिओमध्ये, ऊश्ण् कार्यकर्ते सरकार यांचा पाठलाग करताना दिसत होते, तर पोलिसांनी त्यांची सुटका केली. आसनसोलमध्ये, भाजप नेत्या अग्निमित्रा पॉल यांनी दावा केला की, अल्पसंख्याक बहुल भागातील एका मतदान केंद्राला भेट दिल्यानंतर, एका मोठ्या दगडाने त्यांच्या गाडीला धडक दिली आणि गाडीची तोडफोड करण्यात आली.

**तामिळनाडूमध्ये विक्रमी मतदानाची नोंद |**

गुरुवारी तामिळनाडूच्या ५.७३ कोटी मतदारांपैकी विक्रमी ८४.६९ टक्के मतदारांनी २३४ विधानसभा मतदारसंघांमध्ये आपला मतदानाचा हक्क बजावला. अत्यंत चुरशीने लढल्या गेलेल्या आणि चार प्रमुख पक्षांचा समावेश असलेल्या या निवडणुकीच्या लढतीचा समारोप झाला. सकाळपासूनच मतदानाचा वेग चांगला होता आणि ते प्रामुख्याने हिंसाचार किंवा कोणत्याही अनियमिततेशिवाय पार पडले. विशेष सखोल मतदार यादी सुधारणा प्रक्रियेनंतर पार पडलेली ही पहिलीच निवडणूक होती. मतदानाच्या उच्च टक्केवारीमागील हे एक प्रमुख कारण मानले जात आहे. त्याच वेळी, बदलाची अपेक्षा बाळगून असलेल्या मोठ्या संख्येने नवमतदारांनीही अत्यंत उत्साहाने मतदान केंद्रांवर उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावला.

मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ४,०२३ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले. या शर्यतीत सहभागी असलेल्या प्रमुख व्यक्तींमध्ये मुख्यमंत्री एम.के. स्टालिन यांचा समावेश होता; १९७७ पासून सत्तेत सातत्य राखण्यात अपयशी ठरलेला डीएमकेचा इतिहास बदलण्याचा ते प्रयत्न करत आहेत. तसेच, पुन्हा सत्तेवर येण्यासाठी संघर्ष करणारे एआयएडीएमकेचे सरचिटणीस एडप्पाडी के. पलानीस्वामी; आपल्या पहिल्याच निवडणुकीत मुख्यमंत्री बनण्याचे स्वप्न बाळगणारे अभिनेते आणि तमिळगा वेट्री कझगमचे संस्थापक सी. जोसेफ विजय; आणि स्वतःला एक पर्यायी शक्ती म्हणून सादर करणारे नाम तमिळर काचीचे सीमान हे देखील या शर्यतीत आघाडीवर होते.

# बारामतीत 58 टक्के तर राहुरीत 56 टक्के मतदान

**मुंबई:** बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत, जिथे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार रिंगणात होत्या, गुरुवारी येथे सुमारे ५७.४८ टक्के मतदानाची नोंद झाली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अहिल्यानगर (नगर) जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघातही पोटनिवडणूक झाली असून, तिथे मतदानाची टक्केवारी ५५.३१ टक्के राहिल्याचे त्यांनी सांगितले..

बारामतीचे विद्यमान आमदार असलेले तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झाल्यामुळे या पोटनिवडणुकीची आवश्यकता निर्माण झाली होती.आपली पहिलीच विधानसभा निवडणूक लढवत असलेल्या त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा विजय जवळपास



निश्चित मानला जात आहे. सहानुभूतीची लाट आणि या मतदारसंघावर त्यांच्या कुटुंबाचे असलेले भक्कम वर्चस्व पाहता, त्यांचा विजय सहज होईल अशी अपेक्षा आहे. कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाने त्यांच्या विरोधात उमेदवार उभा केला नसल्यामुळे, ही निवडणूक आता केवळ एक औपचारिकता उरली आहे.या निवडणुकीचे निकाल ४ मे रोजी जाहीर केले जातील.

भाजपचे आमदार शिवाजी कर्डिले यांचे गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये निधन झाल्यामुळे राहुरी विधानसभा जागा

# घरच्या मैदानावरच मुंबई इंडियन्सचा पराभव

**मुंबई |** आयपीएलमध्ये आज मुंबईच्या वानखेडेच्या मैदानावर चेन्नई सुपर किंग्जने मुंबई इंडियन्सचा १०३ धावांनी पराभव केला आहे. चेन्नई सुपर किंग्जने प्रथम फलंदाजी करताना २०७ धावा केल्या होत्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्स १०४ धावांवर ऑलआऊट झाली . त्यामुळे चेन्नईने हा सामना १०३ धावांनी जिंकला.

चेन्नई सुपर किंग्जने दिलेल्या २०७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सूरूवात चांगली झाली नाही. दानेश मालेवार शुन्यावर बाद झाला, त्याच्यापाठोपाठ नमन धीरही शुन्यावर गेला. दोन विकेट झटपट पडल्यानंतर सलामीवीर क्विंटन डिकॉक मोठी खेळी खेळेल अशी अपेक्षा होती, पण तो देखील ७ धावांवर बाद झाला.त्यामुळे मुंबई इंडियन्सचे ११ धावांवर तीन गडी बाद झाले. यानंतर तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादवने मुंबईचा डाव सावरला . पण पुढे जाऊन सूर्यकुमार यादव ३६ तर तिलक वर्मा ३७ धावांवर बाद झाला.

हे दोन खेळाडू बाद झाल्यानंतर मुंबईच्या फलंदाजांना बाद होण्याची गळतीच लागली. हार्दिक पांड्या १, शेर्फन रुदरफोर्ड शून्यावर बाद झाला. त्यानंतर मुंबईचा डाव १०४ वर ऑल आऊट झाला. मुंबईने आजच्या सामन्यात खूप साधारण गोलंदाजी केली. खासकरून हार्दिक पांड्या आणि मिचेल सँटनरने. हार्दिक पांड्याने २ षटकांत ३८ धावा तर मिचेल सँटनरने ४ षटकांत ४४ धावा दिल्या होत्या. हे ६ षटकेच मुंबईला भारी पडल्या. तत्पूर्वी संजू सॅमसनच्या नाबाद १०१ धावांच्या शतकीय खेळीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्जने २०७ धावा केल्या होत्या.

# आमदार संजय गायकवाडांचे पुन्हा बेताल विधान ; प्रकाशकाला धमक्या!

**बुलढाणा |** महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या बेताल वक्तव्यांनी नेहमीच चर्चेत राहणारे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी पुन्हा एकदा सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. दिवंगत विचारवंत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या 'शिवाजी कोण होता?' या जगप्रसिद्ध पुस्तकाच्या शीर्षकावरून त्यांनी केवळ संतापच व्यक्त केला नाही, तर प्रकाशकाला थेट जीवे मारण्याची आणि जीभ छाटण्याची धमकी देऊन आपल्यातील 'दबंगशाही'चे प्रदर्शन केले आहे.

पुस्तकाचे नाव खुपले, पण आशय वाचण्याची तसदी नाही!

गेल्या ३७ वर्षांपासून महाराष्ट्रातील घराघरांत पोहोचलेल्या आणि शिवरायांचा खरा इतिहास सांगणाऱ्या पुस्तकाच्या शीर्षकावर गायकवाडांनी आक्षेप घेतला आहे. 'छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख एकेरी का केला?' असा सवाल करत त्यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवर अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. विशेष म्हणजे, ज्या पुस्तकाने जगभरात महाराजांची कीर्ती पोहोचवली, ते पुस्तक 'वाचण्याची मला गरज नाही' असे म्हणत गायकवाडांनी स्वतःच्याच अज्ञानाचे जाहीर प्रदर्शन केले आहे.

# लाडगाव फाट्याजवळ गॅस पाईपलाईन फुटली; 20 फूट उंच आगीचे लोळ

हिंदू प्रकाशवार्ता। प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर |** जालना रोडवरील लाडगाव (ता. छत्रपती संभाजीनगर) येथे आज, २३ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास भारत पेट्रोलियमची गॅस पाईपलाईन फुटल्याने मोठी आग लागल्याची घटना घडली. पहाटे साडेपाचच्या सुमारास झालेल्या या भीषण भडक्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. आगीचे लोळ साधारण २० फुटांपर्यंत उंच झेपावत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

लाडगाव परिसरातून गेलेली ही गॅस पाईपलाईन प्रामुख्याने ऑरिक सिटी क्षेत्राला गॅस पुरवठा करते. गॅसचा दाब प्रचंड असल्याने गळती होताच आगीचा मोठा भडका उडाला. या आगीच्या उष्णतेमुळे जवळून जाणाऱ्या विद्युत तारा अक्षरशः तापून तुटल्या आणि जमिनीवर विखुरल्या. पहाटेच्या अंधारात आगीमुळे मोठा उजेड पसरल्याने ही घटना तातडीने निदर्शनास आली.

आगीचा भडका उडताच लाडगाव येथील स्थानिक तरुणांनी प्रसंगावधान राखले. त्यांनी तातडीने भारत पेट्रोलियमच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच मुख्य केंद्रातून गॅस पुरवठा तातडीने बंद करण्यात आला, ज्यामुळे संभाव्य मोठा स्फोट टळला. एमआयडीसीच्या अग्निशामक दलाने एका बंबासह तातडीने घटनास्थळी धाव घेत शर्थीच्या प्रयत्नांनी आगीवर नियंत्रण मिळवले.

या घटनेबाबत माहिती देताना भारत पेट्रोलियमचे व्यवसाय प्रमुख मनोज जाधव यांनी सांगितले की: पाईपलाईनवरील चेंबरजवळ साचलेला कचरा कोणीतरी जाळला असावा किंवा अनवधानाने आग लागली असावी. या आगीची उष्णता चेंबरच्या झाकणातून खाली पोहोचली आणि किरकोळ गळतीमुळे हा भडका उडाला. परिस्थिती वेळीच नियंत्रणात आणली असून नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही.'सुदैवाने गॅस पुरवठा वेळीच खंडित करण्यात आल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# गरुड झेपच्या निलेश सोनवणेंसह साथीदारांवर अद्यापही कार्यवाही का नाही?

## राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाची पोलीस आयुक्तांना नोटीस; 15 दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश

### पत्रकार परिषदेत गौतम आमराव यांचे पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

हिंदू प्रकाशवार्ता। प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर |** शरणापूर येथील गरुडझेप ॲकॅडमीमध्ये एका विद्यार्थ्याला दोन महिन्यांपूर्वी झालेली अमानुष मारहाण आणि त्याच्या वडिलांना दिलेल्या जातीवाचक शिवीगाळ प्रकरणाची राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने गंभीर दखल घेतली असून याप्रकरणी आयोगाने छत्रपती संभाजीनगर शहराचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांना नोटीस बजावली असून, केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश दिले आहेत.





निलेश सोनवणे



गौतम आमराव

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक येथील एक विद्यार्थी शरणापूर येथील गरुडझेप अॅकॅडमीमध्ये शिक्षण घेत होता. २३ फेब्रुवारी रोजी फी न भरल्याच्या कारणावरून या विद्यार्थ्याला उपाशी ठेवणे, त्याला बेदम मारहाण करणे आणि जीवे मारण्याची धमकी देण्याचे धक्कादायक प्रकार घडले होते. इतकेच नव्हे तर, विद्यार्थ्याच्या वडिलांना देखील जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली होती.

याप्रकरणी २८ फेब्रुवारी रोजी दौलताबाद पोलीस ठाण्यात अॅकॅडमीचे संचालक निलेश सोनवणे, पठाण, स्वप्नील चव्हाण आणि अभिजित ऊर्फ बोल्ड यांच्यावर अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

**गौतम आमराव यांनी या प्रकरणात पत्रकार परिषद घेत पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. इतर गंभीर गुन्ह्यांत तत्परतेने कारवाई करणारे पोलीस या प्रकरणातील आरोपींना शोधण्यात असमर्थ का ठरत आहेत? आरोपी फरार असल्याचे सांगून पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत का? असे सवाल त्यांनी उपस्थित केले आहेत. यावेळी शहर जिल्हा सरचिटणीस आनंद खरात, शहर जिल्हा उपाध्यक्ष विजय ऊर्फ बाळू रणभरे, शहर सचिव सागर जाधव आणि जिल्हा सचिव आनंद भ्सिसे यांची प्रमुख उपस्थिती होती. आता आयोगाच्या या नोटीसनंतर पोलीस प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

आयोगाचा कडक इशारा

गुन्हा दाखल होऊन बराच काळ लोटला तरी अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. पोलीस तपासात टाळाटाळ होत असल्याचे पाहून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राज्य कार्यकारिणी सदस्य गौतम आमराव यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा केला. त्यांनी पोलीस आयुक्त, विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे वारंवार पत्रव्यवहार केला, परंतु अपेक्षित कारवाई न झाल्याने त्यांनी थेट राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाकडे दाद मागितली होती.

या तक्रारीची दखल घेत आयोगाने आता पोलीस प्रशासनाला धारेवर धरले आहे. नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की:

नोटीस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा.

विहित मुदतीत उत्तर न मिळाल्यास, आयोग कलम ३३८ अंतर्गत न्यायालयाचे अधिकार वापरून संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या हजर राहण्यासाठी समन्स बजावू शकतो.

# करोडीत सरपंच पतीचा 'उच्छाद'; उद्योजक आणि शेतकरी निशाण्यावर!

## 'चहापेक्षा केटली गरम' : पोलिसांच्या भूमिकेकडे लक्ष!

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी |** छत्रपती संभाजीनगर शहराला लागून असलेल्या करोडी ग्रामपंचायत क्षेत्रात सध्या 'चहापेक्षा केटली गरम' असा प्रकार पाहायला मिळत आहे. ग्रामपंचायतीच्या महिला सरपंच सुनीता देवीदास गावंदे असल्या तरी, प्रत्यक्ष कारभार आणि करोडी शिवारात दहशत पसरवण्याचे काम त्यांचे पती देवीदास गावंदे करत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक उद्योजक व शेतकऱ्यांनी केला आहे. या सरपंच पतीच्या बेकायदेशीर हस्तक्षेपामुळे आणि गुंडगिरी प्रवृत्तीमुळे या भागातील विकासकामे ठप्प झाली असून उद्योजकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

**कायद्याची पायमल्ली आणि अधिकार क्षेत्राचे उल्लंघन |** कायद्यानुसार ग्रामपंचायतीचे अधिकार क्षेत्र हे केवळ 'गावठाण' पुरते मर्यादित असते. गावठाणाबाहेरील शेती किंवा औद्योगिक क्षेत्रातील बांधकामे,

### 'हिंदू प्रकाश वार्ता' चा एल्गार !

**करोडी भागातील या भ्रष्ट आणि गुंड प्रवृत्तीचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी 'दैनिक हिंदू प्रकाश वार्ता' ने कंबर कसली आहे. जोपर्यंत या भागातील उद्योजक आणि शेतकरी निर्भय होत नाहीत आणि अशा 'गुंड' प्रवृत्तीच्या सरपंच पतीवर कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत हा पाठपुरावा सुरूच राहणार आहे.**

परवानगी आणि कारवाईचे अधिकार महसूल विभाग आणि 'छत्रपती संभाजीनगर विकास प्राधिकरणाकडे' आहेत. ग्रामपंचायतीचे प्रशासकीय प्रमुख म्हणून ग्रामविकास अधिकाऱ्याला कारवाईचे अधिकार असताना, सरपंच पती परस्पर शिवारात जाऊन दमदाटी करून बांधकामे थांबवत असल्याचे समोर आले आहे. कोणत्याही प्रकारचा ठराव नाही, कायदेशीर नोटीस नाही, केवळ दहशतीच्या जोरावर



मजुरांना धमकावणे आणि काम बंद पाडणे हा नित्यक्रम बनला आहे.

**विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांशी साटेलोटे? |** सरपंच पतीच्या मनमानीचा



एक धक्कादायक प्रकार गट नंबर १२४ वरील एका महिला उद्योजकाच्या बाबतीत समोर आला आहे.कोणताही कायदेशीर आधार किंवा ग्रामपंचायतीचा ठराव नसताना, सरपंच पतीने केवळ एका फोनवर संबंधित विद्युत मंडळाच्या सहाय्यक अभियंत्याला हाताशी धरून मागील २५ दिवसांपासून या उद्योजिकेचा वीजपुरवठा अद्यापही सुरू होवू दिला नाही. 'सहाय्यक अभियंता हा शासनाचा नोकर आहे

### उद्योजक आणि शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक?

**करोडी शिवारात शेतकरी किंवा उद्योजक जेव्हा स्वतःच्या जागेत बांधकाम सुरू करतात, तेव्हा सरपंच पती तिथे जावून 'बेकायदेशीर' रित्या काम थांबवतात. हे काम सुरू ठेवण्यासाठी पैशांची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास मजुरांना धमकावून हाकलून दिले जाते. यामुळे अनेक छोटे-मोठे उद्योजक हैराण झाले आहेत. विशेष म्हणजे, महसूल विभागाच्या अखत्यारीत येणारे शिव धुरा किंवा नंबर धुरा वादातही सरपंच पती हस्तक्षेप करून स्वतःचा 'न्याय' लावत असल्याची चर्चा परिसरात आहे.**

की, सरपंच पतीचा खासगी नोकर?' असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. या अभियंत्याच्या भूमिकेवरही लवकरच मोठे खुलासे नक्कीच करणार आहोत.

**प्रशासन आणि ग्रामविकास अधिकारी गप्प का? |**

सरपंच पती जेव्हा ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या अधिकारात हस्तक्षेप करून परस्पर नोटिसा न देता कामे बंद पाडतात, तेव्हा ग्रामविकास अधिकारी गप्प का आहेत? त्यांनी आपल्या कार्यालयातील वरिष्ठांना याबाबत अहवाल दिला आहे का? असा प्रश्न निर्माण होत आहे. सरपंच पतीच्या या गुंडगिरीमुळे सरकारच्या 'उद्योग वाढवा, रोजगार द्या' या धोरणाला हरताळ फासला जात आहे.

करोडी भागातील उद्योजक दहशतीखाली आहेत. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून सरपंच पतीच्या गुंडगिरीला लगाम घालावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल,' अशी मागणी करोडी परिसरातील नागरिक आणि उद्योजकांनी केली आहे.


**पुढील भागात वाचायला विसरू नका: सहाय्यक विद्युत अभियंत्याचा 'कारनामा' आणि भ्रष्ट साटेलोट्याचा सविस्तर वृत्तांत! |**

# सं पा द की य

## ट्रम्प यांच्याकडून भारताचा अपमान!

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर एक वादग्रस्त व्हिडिओ शेअर केल्याने जागतिक पातळीवर मोठा वाद निर्माण झाला आहे. या व्हिडिओमध्ये भारताचा उल्लेख अत्यंत अपमानास्पद शब्दांत करण्यात आला होता. मात्र वाद वाढल्यानंतर अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्याने स्पष्टीकरण देत म्हटले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारताचे वर्णन सकारात्मक शब्दांत केले आहे. भारत हा एक महान देश असून तिथल्या शीर्षस्थानी पंतप्रधान नरेंद्र मोदी माझे अत्यंत चांगले मित्र आहेत. ट्रम्प यांनी आपल्या 'ट्रूथ सोशल' या प्लॅटफॉर्मवर पुराणमतवादी लेखक आणि रेडिओ होस्ट मायकल सॅवेज यांचा एक व्हिडिओ शेअर केला होता. या व्हिडिओमध्ये सॅवेज यांनी अमेरिकेतील जन्मसिद्ध नागरिकत्व कायद्यावर टीका केली आहे. सॅवेज यांनी आरोप केला की, सध्याच्या कायद्याचा स्थलांतरित गैरफायदा घेत आहेत. अनेक महिला गरोदरपणाच्या नवव्या महिन्यात अमेरिकेत येतात जेणेकरून बाळ तिथे जन्मताच त्याला अमेरिकन नागरिकत्व मिळावे. हे स्थलांतरित चीन, भारत किंवा पृथ्वीवरील इतर कोणत्याही नरकासारख्या देशातून येतात, असे वादग्रस्त विधान सॅवेज यांनी या व्हिडिओत केले आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने या प्रकरणावर अत्यंत सावध प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकार परिषदेत प्रवक्ते रणधीर जयस्वाल हे म्हणाले, आम्ही यासंदर्भातील काही अहवाल पाहिले आहेत. सध्या मी यावर एवढेच बोलू शकेन. भारताने यावर कोणतीही आक्रमक प्रतिक्रिया न देता मौन पाळणे पसंत केले आहे. मायकल सॅवेज यांनी सर्वोच्च न्यायालयात जन्मसिद्ध नागरिकत्वावर सुरू असलेल्या चर्चेवर संताप व्यक्त केला. केवळ कायद्याच्या भाषेवर खेळ सुरू असून हे थांबले पाहिजे, असे ते म्हणाले. सॅवेज यांनी 'अमेरिकन सिव्हिल लिबर्टीज युनियन' वरही टीका केली. अमेरिकेत बेकायदेशीर स्थलांतरितांना भरून इथली लोकसंख्या बदलण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामागे एक चिनी-अमेरिकन वकील आहे, जो मला अत्यंत दुष्ट आणि धूर्त वाटतो, असे वर्णद्वेषी विधान त्यांनी केले. अध्यक्ष ट्रम्प यांनी 'नरक' वाद शमवण्याचा प्रयत्न केला, भारताला 'सर्वोच्च स्थानी एक चांगला मित्र असलेला महान देश' म्हटले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुराणमतवादी लेखक आणि रेडिओ होस्ट मायकल सॅव्हेज यांची वंशद्वेषी टिप्पणी पुन्हा पोस्ट केल्यानंतर पेटलेल्या आगीत तेल ओतू नये म्हणून, ज्यामध्ये सॅव्हेज यांनी भारत, चीन आणि इतर राष्ट्रांना 'नरक' म्हटले होते, अध्यक्षांनी आता भारताची प्रशंसा केली आहे. ते म्हणाले, 'हा एक महान देश आहे आणि सर्वोच्च स्थानी माझा एक खूप चांगला मित्र आहे.' २३ एप्रिल रोजी, अध्यक्ष ट्रम्प यांनी पुराणमतवादी भाष्यकार मायकल सॅव्हेज यांचा एक व्हिडिओ शेअर करून जन्मसिद्ध नागरिकत्वावरील वादग्रस्त चर्चेकडे लक्ष वेधले. त्या क्लिपमध्ये, सॅव्हेज यांनी आरोप केला की स्थलांतरित लोक 'गर्भधारणेच्या नवव्या महिन्यात' अमेरिकेत येऊन अमेरिकेच्या कायद्यांचा गैरफायदा घेतात. त्यांचा दावा आहे की, येथील बाळ तात्काळ नागरिक बनते आणि मग ते चीन किंवा भारत किंवा पृथ्वीवरील इतर कुठल्यातरी नरकातून संपूर्ण कुटुंबाला घेऊन येतात.' भारत, चीन आणि इतर 'अत्यंत दुर्गम' ठिकाणांहून लोक गरोदरपणाच्या नवव्या महिन्यात अमेरिकेत येतात आणि अशा मुलाला जन्म देतात, जे मूल तात्काळ नागरिक बनते. 'येथे जन्माला आलेले बाळ तत्काळ नागरिक बनते, आणि त्यानंतर ते चीन, भारत किंवा या पृथ्वीवरील इतर कोणत्याही 'नरकसदृश' ठिकाणाहून आपल्या संपूर्ण कुटुंबाला येथे आणतात. हे पाहण्यासाठी तुम्हाला फार दूर जाण्याची गरज नाही. सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीचा संदर्भ देत ज्यामध्ये सॅव्हेज यांच्या मते 'अमेरिकेत बेकायदेशीर परकीयांचा पूर लोटण्याच्या' बाजूने युक्तिवाद केला होता. सॅव्हेज यांनी असा आरोप केला की, अमेरिका ही चिनी आणि भारतीय लोकांच्या गर्दीने व्यापली जात आहे; हे लोक येथे केवळ 'आपल्या भूमीवर बाळाला जन्म देण्यासाठी' येतात आणि त्यानंतर आपल्या संपूर्ण कुटुंबाला येथे आणतात. त्यांनी असे म्हटले की, हे स्थलांतरित लोक 'आपली राष्ट्रीय ओळख नष्ट करत आहेत' आणि त्यांना अमेरिकेचे रूपांतर चीन व भारताच्या एका वसाहतीमध्ये करायचे आहे.

## जालना जिल्ह्यात ११०६ रुग्णांना सुमारे ८.५६ कोटींची मदत

हिंदू प्रकाशवार्ता

**जालना :** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. जालना जिल्ह्यात आर्थिक वर्षात ११०६ रुग्णांना सुमारे ८ कोटी ५६ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत :** कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया , मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.


**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत :** १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत जालना जिल्ह्यातील ११०६ रुग्णांना सुमारे ८ कोटी ५६ लाख ८५ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या पुढाकारातून राज्यातील शेकडो गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी भक्कम आधार मिळत आहे. सुधारित कार्यपद्धती, तातडीने निर्णय आणि समाजाच्या सहभागामुळे मदतीचा लाभ अधिक वेगाने गरजूंपर्यंत पोहोचत आहे. अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी रूग्णांनी १८००१२३२२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले.

साधकांना मानवी बुद्धीच्या आकलनापलीकडची, दिङ्मूढ करणारी अनुभूती देणारी खडतर आध्यात्मिक साधना म्हणजे 'पायी' नर्मदा परिक्रमा. 'परि' म्हणजे सभोवार. 'क्रम' म्हणजे फिरणे. उजव्या बाजूला दैवताला (नर्मदा मैय्याला) ठेवून चालत रहाणे म्हणजे परिक्रमा. (प्रदक्षिणा).

ही खडतर नर्मदा परिक्रमा न करताही या पदयात्रेतील थक्क करणाऱ्या, विस्मयकारक घटना 'नर्मदे हर हर' हे श्री. जगन्नाथ कुंटे यांचे विलक्षण पुस्तक वाचताना अक्षरशः डोळ्यासमोर उभ्या राहतात आणि 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती' या भावनेतून वाचताना अनेकदा आपण शब्दशः भक्तीभावाने हात जोडतो. श्री. कुंटे हे कसलाही बडेजाव न मिरवणारे अध्यात्ममार्गातील मोठे साधक. 'नर्मदा परिक्रमा कर' अशी आज्ञा त्यांना ध्यानीमनी नसताना 'ध्यानात' झाली. आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांनी एकदा नव्हे, दोनदा नव्हे तर तब्बल तीनदा ही खडतर परिक्रमा पायी चालत पूर्ण केली. नव्हे 'नर्मदामैय्याने ती करवून घेतली' असे त्यांनी वारंवार आग्रहाने नमूद केले आहे आणि संपूर्ण श्रेय विनम्र भावाने नर्मदा मातेलाच दिले आहे. ज्याचा अन्वयार्थ लावता येत नसल्याने 'चमत्कार' गणले जातील असे लोकविलक्षण अनुभव या परिक्रमा कालावधीत त्यांना सातत्याने आले. नर्मदामैय्याचे विविध रूपात दर्शन घडले. आणि ते घडून गेल्यानंतर त्याची जाणीव झाली. साक्षात श्री हनुमंत कृपेचा अनुभव आला आणि शेवटच्या परिक्रमेत महाभारतातील अश्वत्थाम्याचे दर्शनही घडले. अर्थात हे अनुभव येण्याची 'योग्यता' आणि 'आवाका' असणेही तितकेच महत्त्वाचे. लेखक महोदयांना त्यांच्या गुरुंकडून 'शक्तिपात दीक्षा' मिळाली होती. ( गुरुने आपल्या आध्यात्मिक शक्तीद्वारे शिष्याची सुक्त शक्ती (कुंडलिनी) जागृत करणे म्हणजे शक्तिपात. 'शक्ती' म्हणजे दैवी ऊर्जा किंवा चैतन्य. 'पात' म्हणजे उतरवणे किंवा संक्रमण करणे. जेव्हा गुरु आपले तपोबल शिष्यामध्ये संक्रमित करतात तेव्हा त्याला 'शक्तिपात' म्हणतात.) शक्तीपात दीक्षा मिळाली की ध्यानाला बसल्यावर विलक्षण अनुभव येतात. ते 'साक्षीभावाने' बघायचे असतात. लेखक महोदय म्हणजे जात, धर्म, पंथ हे काहीही न मानणारा, स्वतःच्या साधनेचे, त्यातून प्राप्त झालेल्या दिव्य शक्तींचे कसलेही स्तोम न माजविणारा, विनम्रभवाने संपूर्ण श्रेय गुरूला देणारा अवलिया.

पायी नर्मदा परिक्रमा करताना २६०० ते ३००० किलोमीटरचे हे अंतर पार करण्यास साधारण तीन ते चार महिने लागतात. या काळात




## लोकविलक्षण अनुभवांचा थरार........!

व्रतस्थ, नम्र, अहंभाव सोडून मैय्याला शरणागत म्हणून रहायचे असते. जिची परिक्रमा (प्रदक्षिणा) केली जाते अशी ही जगातील एकमेव नदी. भगवान शंकरांनी तांडव नृत्य केले तेव्हा त्यांच्या अंगावरील घामाच्या थेंबांमधून नर्मदेचा उगम झाला. म्हणून ही 'शिवकन्या'. तिला 'रेवा' असेही म्हणतात. संस्कृतमध्ये रेवा (Reva) म्हणजे उड्या मारणारी. वेगाने वाहणारी. 'रिं' या धातूपासून तयार झालेला हा शब्द. त्याचा अर्थ 'वाहणे' असा होतो. नर्मदेचा उगम अमरकंटक (मध्य प्रदेश) येथे होतो. विंध्य आणि सातपुडा पर्वतांच्या दरम्यान असलेल्या खडकाळ, दुर्गम प्रदेशातून खडकांवरून आदळत, वेगाने उड्या मारत ती वाहते. म्हणून 'रेवा'.

लेखक महोदय प्रास्ताविकात म्हणतात,'

लिहिणे आपले काम नाही. अभ्यास नाही. लेखकुपणाचा आव नाही. जे जाणवले, जे दिसले, ते मस्त धून लागली म्हणून लिहितोय. काळ अनंत आहे. आपल्या अस्तित्वाचा काळाच्या पटावर फराटासुद्धा उठणार नाही. सगळे त्या त्या क्षणाचे. बाकी सारे मत्य.'आतूनच आज्ञा झाली म्हणून सांगायचे......'

नोव्हेंबर १९९९ मध्ये लेखक महोदयांनी ओंकारेश्वर येथून पहिल्या नर्मदा परिक्रमेला प्रारंभ केला. परिक्रमेला प्रारंभ करताना नर्मदेत स्नान करून परिक्रमेचा संकल्प करायचा. 'तूच परिक्रमा पूर्ण करून घे' म्हणून नर्मदामाईला साकडे घालायचे. 'पंचकन्या' म्हणजे पाच छोट्या आदिवासी मुलींची 'नर्मदा' समजून पूजा करायची आणि 'कढाई' म्हणजे कढईत गोडाचा शिरा करून तो खाऊ घालायचा. 'नर्मदे हर' म्हणून चालायला (परिक्रमेला) सुरुवात करायची ! या पदयात्रेत नर्मदामैय्याचे पाणी कुठेही ओलांडायचे नाही असा दंडक आहे. नदी ओलांडल्यास परिक्रमा भंग पावते.आध्यात्मिक दृष्ट्या समृद्ध करणा-या, 'आत्मशुद्धी' करणा-या या प्रदीर्घ पदयात्रेत जसे 'चमत्कार' अनुभवायला मिळाले तसेच माणसांचे 'चमत्कारिक' अनुभवही पावलोपावली आले. ओघाओघात 'देहात्मबुद्धी' नाहीशी होणे, 'देव' म्हणजे काय ?, 'साधना' म्हणजे काय ? या मुद्द्यांचाही वाचकांना विचार करायला लावणारा ऊहापोह लेखक महोदयांनी केला आहे.

परिक्रमेच्या नावाखाली 'लुटालूट' करणारे दांभिक, लबाड लोक, बुवाबाजीचा धंदा, गोरगरिब अशिक्षित आदिवासींची छळवणूक आणि पिळवणूक, परान्नपुष्ट झालेले भोंदू गोसावी, बैरागी याबाबतही पोटतिडिकीने लिहिले आहे. मात्र स्वार्थाने बरबटलेल्या या बुजबुजाटात प्रसंगी पदरमोड करून, निरपेक्ष भावनेतून आदिवासी लोकांच्या प्रगतीसाठी झटणारे कार्यकर्तेही आहेत. पुस्तक वाचून पूर्ण झाल्यावर 'काय वाचायला मिळालं आपल्याला हे' या भावनेतून आपण भारावून जातो. त्याचबरोबर अनेक प्रश्नदेखील डोक्यात गर्दी करतात.

तुम्हाला नर्मदा परिक्रमा करायची असली किंवा नसली तरी सजग वाचक असाल तर हे पुस्तक अगदी नक्की वाचा. नर्मदे हर !

**- रश्मी साठे**

# उद्योगस्नेही धोरणामुळे 'ग्लोबल इन्व्हेस्टमेंट हब' म्हणून महाराष्ट्राची ओळख-मुख्यमंत्री

## डेन्मार्कच्या राजदूतांनी घेतली मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट



हिंदू प्रकाशवार्ता

**मुंबई :** महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन असून परदेशी गुंतवणूकदारांसाठी सर्वाधिक पसंतीचे राज्य आहे. राज्य शासनाच्या उद्योगस्नेही धोरणांमुळे जगभरातील कंपन्यांसाठी महाराष्ट्र 'ग्लोबल इन्व्हेस्टमेंट हब' म्हणून उदयास येत असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

भारतातील डेन्मार्कचे राजदूत रास्मुस अबिलगार्ड क्रिस्टेन्सेन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते. या सदिच्छा भेटीदरम्यान महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधी, बंदर विकास, शिपिंग, ऊर्जा आणि पाणी व्यवस्थापन या विषयांवर चर्चा करण्यात आली.या प्रसंगी राजदूत रास्मुस अबिलगार्ड क्रिस्टेन्सेन यांच्यासह फर्स्ट सेक्रेटरी (ट्रेड पॉलिसी अँड इकॉनॉमिक अफेअर्स) मॅथियास एमिल बेंग्टसन तसेच मानद डेन्मार्क वाणिज्य दूतावास, मुंबईचे उपमहावाणिज्यदूत कन्नन नटराजन उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाची माहिती डेन्मार्कच्या प्रतिनिधींना दिली. वाढवण बंदरामुळे महाराष्ट्र आणि देशाला जागतिक स्तरावर सागरी महासत्ता बनण्याची संधी मिळेल. तसेच लॉजिस्टिक्स आणि निर्यात वाढीस मोठे बळ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात जलवाहतूक व्यवस्थेला चालना देण्यासाठी महत्त्वाकांक्षी वॉटर टॅक्सी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी संपूर्ण प्रणाली विकसित करून प्रभावी नियंत्रण व्यवस्था उभारण्यावर भर दिला जाणार आहे. इलेक्ट्रिक फेरी आणि इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी तंत्रज्ञानासाठी डेन्मार्कच्या आघाडीच्या कंपन्यांशी भागीदारी करण्यास राज्य शासन इच्छुक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

डेन्मार्कने त्यांच्या किनारी भागात आणि अल्प अंतराच्या फेरी सेवांमध्ये इलेक्ट्रिक तंत्रज्ञान यशस्वीपणे वापरले असून, अशा तंत्रज्ञानाचा मुंबई-कोकण किनारपट्टीसाठीही मोठा उपयोग होऊ शकतो, असे डेन्मार्कचे राजदूत क्रिस्टेन्सेन यांनी सांगितले. तसेच डेन्मार्कच्या सुमारे ६० कंपन्या मुंबई व पुणे परिसरात उत्पादन, रिटेल, सेवा, शिपिंग आदी क्षेत्रांत कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. भारत-डेन्मार्क ग्रीन स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप अंतर्गत, विशेषतः सागरी क्षेत्रात महाराष्ट्र राज्य महत्त्वाचा भागीदार ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'हा रथ मागे जाऊ देऊ नका : १३% आरक्षण विभाजनात नव्हे, एकतेत जपा!'

'हा चळवळीचा रथ पुढे नेता येत नसेल, तर आहे तिथेच ठेवा; पण मागे जाऊ देऊ नका ' डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे हे शब्द आजच्या काळात केवळ प्रेरणादायी नाहीत, तर जागृतीचा इशारा देणारे आहेत. हे शब्द आपल्याला आरशात पाहायला भाग पाडतात आपण ज्या दिशेने चाललो आहोत, ती दिशा खरोखर प्रगतीची आहे का? की नकळत आपण पुन्हा मागे वळत आहोत? आज अनुसूचित जाती (SC) समाजाच्या आरक्षणामध्ये 'अ, ब, क, ड' असे वर्गीकरण करण्याचा प्रस्ताव समोर येत आहे. वरवर पाहता हा प्रस्ताव 'न्याय्य वाटप' या संकल्पनेवर आधारलेला वाटतो. पण त्यामागील वास्तव अधिक गुंतागुंतीचे आहे. हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर सामाजिक एकजुटीचा, ऐतिहासिक संघर्षाचा आणि पुढील पिढ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. म्हणूनच या विषयाकडे समाजाभिमुख दृष्टिकोनातून पाहणे अत्यंत गरजेचे आहे. भारतातील आरक्षण व्यवस्था ही कुठल्याही सत्ताधाऱ्यांची दया नाही. ती शतकानुशतके चाललेल्या सामाजिक अन्यायाविरुद्धच्या लढ्याची कमाई आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी अंधारलेल्या समाजात शिक्षणाचा दीप पेटवला. आरक्षणाचे जनक शाहू महाराज यांनी वंचितांना नोकरीत स्थान देत न्यायाला व्यवहारात आणले.आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून या संघर्षाला अमरत्व दिले. आरक्षण म्हणजे अन्यायाविरुद्धचा प्रतिकार,

**समानतेसाठीची हमी,आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार.**

वर्गीकरण की विभाजन? असा अनेकांना पडलेला प्रश्न आहे. 'अ, ब, क, ड' वर्गीकरणाचा उद्देश सांगितला जातो सर्व घटकांपर्यंत आरक्षणाचा लाभ पोहोचवणे.पण एक मूलभूत प्रश्न आपण स्वतःला विचारायला हवा

आजपर्यंत जे आरक्षण आहे, ते पूर्णपणे लागू झाले आहे का? अनुशेष भरला गेला आहे का?

सर्व रिक्त पदे भरली गेली आहेत का? जर याचे उत्तर 'नाही' असेल, तर मग वर्गीकरणाचा मुद्दा पुढे आणण्यामागील उद्देश काय? आज अनेक शासकीय विभागांमध्ये एण आरक्षणातील हजारो पदे रिक्त आहेत.भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबवली जाते.'योग्य उमेदवार नाही' या कारणावरून जागा खुल्या वर्गाला दिल्या जातात.ही परिस्थिती केवळ प्रशासनिक त्रुटी नाही, तर सामाजिक अन्याय आहे.जिथे पूर्ण आरक्षण लागू होत नाही,तिथे त्याचे तुकडे करून न्याय कसा मिळणार? SC मधील ५९ जातीला मिळालेले १३ % आरक्षणाचे तुकडे झाले, तर काय होईल? प्रत्येक गटासाठी लहान टक्केवारी,संधींची मर्यादा,स्पर्धेची तीव्रता आणि सर्वात महत्त्वाचे एकतेचा भंग आज आपण एकत्र आहोत म्हणून आपला आवाज प्रभावी आहे.जर आपण विभागलो, तर आपली ताकद कमी होईल.

इतिहास साक्षी आहे विभाजन हे शोषणाचे पहिले पाऊल असते.

SC समाजात ५९ जाती आहेत. काहींची लोकसंख्या मोठी आहे, तर अनेक जाती अत्यल्प आहेत. जर वर्गीकरण झाले, तर लहान गटांना म्हणजे लहान जातींना खरोखर संधी मिळेल का? की ते आणखी मागे पडतील? जर एखाद्या गटात पात्र उमेदवार नसेल, तर ती जागा खुल्या वर्गाला जाईल.म्हणजेच आरक्षणाचा प्रभाव हळूहळू कमी होईल.आज सरकारी नोकऱ्यांमध्ये कॉन्ट्रॅक्ट पद्धती वाढत आहे.आरक्षण लागू नाही,नोकरीची हमी नाही,पदोन्नती नाही,सामाजिक सुरक्षा नाही ही पद्धत वाढत राहिली, तर आरक्षण फक्त कागदावर उरेल.आज खऱ्या अर्थाने आत्मपरीक्षणाची गरज आहे. आज काही नेते आरक्षणाच्या नावावर राजकारण करत आहेत असे निदर्शनात येत आहे. जर धोका झाला तर तरुण पिढी अशा पुढाऱ्याला माफ करणार नाही.हे तेवढेच खरे आहे. हा राहिला भविष्याचा प्रश्न? पण मूळ प्रश्न असा आहे ते खरोखर समाजासाठी लढत आहेत का? आजही ग्रामीण भागातील विद्यार्थी अत्यंत कठीण परिस्थितीत शिक्षण घेत आहे.

त्याच्यासाठी आरक्षण म्हणजे जीवनरेखा आहे. अनेक तरुण उराशी स्वप्न बाळगून आहेत. मी उच्चशिक्षित होऊन कुठेतरी आयएस अधिकारी होईल. बाबासाहेबांचे आणि आई वडिलांचे नाव उज्वल करेल असे स्वप्न उराशी बाळगून रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले

'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.' शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.आजही हेच तत्त्व लागू आहे.शिक्षण म्हणजे शक्ती,जागरूकता म्हणजे संरक्षण,एकता म्हणजे विजय.

आपल्यासारखे एक एक नव्हे अनेक विद्यार्थीझझोपडीत राहून रात्रंदिवस अभ्यास करतात. हाच विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत करून नोकरीचे स्वप्न उराशी बाळगून आई-वडिलांचे स्वप्न उराशी बाळगणाराष्ठअशा अविर्भावात वाढलेलाष्ठतो स्वप्न पाहतो 'मी अधिकारी बनेन'

त्याच्यासाठी आरक्षण म्हणजे एकमेव संधी आहे.जर तेच तुटले, तर त्याचे स्वप्नही तुटेल. म्हणून अजूनही वेळ गेलेली नाही. बाबासाहेबांनी तुम्हाला आम्हाला दिलेलं हे अनमोल 'रत्न' सांभाळून ठेवा याचे तुकडे करू नका आपापसात भांडू नका..! आपल्या येणाऱ्या पिढीसाठी हे अनमोल 'रत्न'म्हणजे आरक्षण सांभाळून ठेवा ही हाक आपले बुजुर्ग मंडळी देत आहेत.आजची पिढी विचार करू शकते, निर्णय घेऊ शकते आणि बदल घडवू शकते. अंधानुकरण नको,तर्क हवा,जागरूकता हवी. यासाठी अनुशेष तात्काळ भरला गेला पाहिजे,रिक्त पदे भरली पाहिजेत,कॉन्ट्रॅक्ट पद्धतीला विरोध झाला पाहिजे,आरक्षणाची पूर्ण अंमलबजावणी झाली पाहिजे,समाजात एकता टिकवली पाहिजे म्हणून आपण सर्वांनी मिळून एकतेचा संकल्प करायला हवा.



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No. MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

**विशेष लेख**

**रामदास वच्छलामाई रखमाजी वाघमारे**
(डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त )
छत्रपती संभाजीनगर, मो. 8888125610

बांधवांनो,'हा चळवळीचा गाडा पुढे नेता येत नसेल तर तो आहे तिथेच ठेवा; पण मागे जाऊ देऊ नका!' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे शब्द केवळ एक वाक्य नसून,आपल्या समाजाला दिलेली शेवटची 'इच्छा' आणि सर्वात मोठी 'ताकीद' आहे. आजच्या धावपळीच्या आणि सोयीच्या राजकारणात, समाजकारणात आपण नक्की कुठे आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. ज्या काळात श्वास घेण्यावरही बंधनं होती, त्या काळात बाबासाहेबांनी आपल्या रक्ताचं पाणी करून हा 'परिवर्तनाचा रथ' ओढायला सुरुवात केली. हा रथ इथपर्यंत येण्यासाठी किती पिढ्यांनी स्वतःला गाडून घेतलं, किती माता-भगिनींनी पोटाला चिमटा काढला आणि किती तरुणांनी आपल्या आयुष्याची होळी केली, याची कल्पनाही आज आपल्याला करवत नाही.आज आपण सुटाबुटात फिरतोय, मोठ्या पदांवर आहोत, हक्काने बोलतोय... हे सर्व त्या रथाने पार केलेल्या अंतरामुळेच शक्य झालं आहे. पण प्रश्न असा उरतो की, आपण तो रथ पुढे नेतोय का?

रथ मागे सरकतोय का?बाबासाहेबांना भीती होती की, माझ्या नंतर हा रथ पुढे नेणारे लोक मिळतील की नाही? म्हणून त्यांनी बजावलं होतं 'जर पुढे नेता येत नसेल, तर आहे तिथेच ठेवा; पण तो मागे जाऊ देऊ नका.' आजच्या परिस्थितीत 'रथ मागे जाणे' म्हणजे नक्की काय? जेव्हा आपण स्वार्थासाठी समाजाचे हित डावलतो, तेव्हा रथ मागे सरकतो.जेव्हा आपण विद्येपेक्षा विलासाला महत्त्व देतो, तेव्हा रथ मागे सरकतो.जेव्हा आपण तुलना आणि मत्सरापोटी एकमेकांचे पाय खेचतो, तेव्हा रथ मागे सरकतो.

आणि सर्वात महत्त्वाचे, जेव्हा आपण आपली वैचारिक धार सोडून केवळ भावनिक राजकारणाचे बळी ठरतो, तेव्हा तो रथ वेगाने मागे घसरू लागतो. थांबणे ही सुद्धा एक कृती आहे! कधीकधी परिस्थिती विपरीत असते. अनेक राजकीय वादळं येतात, अनेक राजकीय रस्ते निसरडे होतात. अशा वेळी बाबासाहेब म्हणतात, 'तो आहे तिथेच ठेवा.' याचा अर्थ असा की, किमान आपली नैतिकता, स्वाभिमान आणि विचार गहाण टाकू नका. जर तुमच्यात तो रथ ओढण्याची ताकद नसेल, तर किमान त्याला खीळ घालून उभे राहा, जेणेकरून पुढची नवतरुण पिढी येईल तेव्हा त्यांना तो शून्यापासून सुरू करावा लागणार नाही. आणि आता जर ५९ जाती तुकड्यांमध्ये विभागल्या गेल्या तर येणाऱ्या पिढीला परत शून्यापासून सुरुवात करावी लागेल 'आपण मिळवलेलं गमावणं, हा आपल्या पूर्वजांच्या बलिदानाचा अपमान आहे.' आपल्याला विचार करावा लागेल की, आपण या रथाचे 'सारथी' आहोत की केवळ 'प्रवासी'? प्रवासी फक्त सोयी पाहतो, पण सारथ्याला रथाच्या चाकाची आणि वाटेची काळजी असते. बाबासाहेब म्हणतात शिक्षण केवळ पदव्या नकोत, तर प्रज्ञा हवी. संघटन केवळ गर्दी नको तर शिस्तबद्ध संघटन हवे.

नैतिकता सत्तेपेक्षाही श्रेष्ठ चारित्र्य हवे.

बांधवांनो, हा परिवर्तनाचा गाडा ध्येयाच्या शिखरापर्यंत पोहोचवायचा असेल, तर आपल्याला पुन्हा एकदा 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या मंत्राचा खऱ्या अर्थाने स्वीकार करावा लागेल. जर आपल्याला तो रेटा देता येत नसेल, तर किमान तो मागे जाणार नाही याची तरी काळजी घेऊया. आपल्या कर्तृत्वाने रथाची उंची वाढवता आली नाही तरी चालेल, पण आपल्या कृत्याने त्याची मान खाली झुकू देऊ नका. आरक्षणाचे तुकडे होऊ देऊ नका.कारण आरक्षण हे SC मधील ५९ जातीतील करोडो लोकांच्या अस्मितेचा आणि अस्तित्वाचा आधार आहे! 'हा रथ मागे जाऊ देऊ नका'

आज गरज आहे जागरूकतेची,एकतेची,संघर्षाची,
चला आपण सर्व मिळून ठरवूया
हा रथ पुढे नेण्याचा आणि कधीही मागे न जाण्याचा!
जय भीम! जय संविधान!

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी




## राज्य पतसंस्था फेडरेशच्या अध्यक्षाचा राजीनामा

**नाशिक :** स्वत:ला अध्यात्मिक गुरू म्हणवून घेणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरातने केवळ भक्तांची फसवणूकच केली नाही, तर त्यांच्याच आधार आणि पॅन कार्डचा गैरवापर करून चक्क पतसंस्थांमध्ये बोगस खात्यांचा डोंगर उभा केला होता. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी समता पतसंस्था ही पोलिसांच्या रडारवर होती. अखेर या प्रकरणात अपडेट समोर आली आहे. पतसंस्थेतील एका बड्या व्यक्तीला आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे.समता पतसंस्थेचे संस्थापक काका कोयटे यांना राज्य पतसंस्था फेडरेशच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून काका कोयटे फेडरेशनचे अध्यक्ष आहेत. अशोक खरातशी जवळचे संबध भोवले असून अखेर काका कोयटे यांना अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. दहा वर्षापासून कोयटे हे फेडरेशनचे अध्यक्ष होते.

## शरद पवारांना डिस्चार्ज

**मुंबईः** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात मंगळवारी दाखल करण्यात आले होते. त्यानंतर आता त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. शरद पवार हे सध्या त्यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी आहेत. दोन दिवस तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेतल्यानंतर आज दुपारी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. अंकुश काकडे म्हणाले, पवार साहेबांची तब्येत उत्तम असून ब्रिच कँडी मधून त्यांना डिस्चार्ज मिळालेला आहे. सिल्वर ओक येथे ते विश्रांती घेत आहेत.

## काँग्रेसचा फरार पदाधिकारी ताब्यात

**अकोला :** काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीला जवळपास साडे तीन महिन्यानंतर अटक करण्यात आली आहे. हिदायत पटेल यांच्यावरील हल्ल्यानंतर हल्लोखोर पसार झाला होता. आरोपी हा काँग्रेसचा पदाधिकारी असून हत्येनंतर फरार होता. हिदायत पटेल यांच्यावर चाकू हल्ला करण्यात आला होता, अतिरक्तस्त्रावामुळे त्यांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.मोहाळा गावात राजकीय कारणावरून वाद सुरू होता. मोहाळा गावात राजकीय कारणावरून वाद सुरू होता. ६ जानेवारी रोजी अकोट तालुक्यातील मोहाळा येथील मशिदीत नमाज अदा करण्यासाठी गेले होते. नमाजानंतर दुपारी दीडच्या सुमारास एका युवकाने त्यांच्यावर चाकूने सपासप वार केले. मान व पोटावर गंभीर जखमा झाल्याने हिदायत पटेल रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळले. या हल्ल्यात पटेल हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने अकोला येथील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले, पण शरीरावर वर्मी घाव बसल्याने त्यांचा मृत्यू झाला.

## ट्रक आणि दुचाकीचा भीषण अपघात : तिघांचा मृत्यू

**वाशिमः** मंगरूळपीर महामार्गावरिल पारडी टकमोर फाट्याजवळ आंबे वाहून नेणाऱ्या मिनी ट्रकने दुचाकीचा भीषण अपघात झाला आहे. या भीषण अपघातात वारा जहांगीर गावातील दुचाकीवरील वडील, आई आणि मुलगा अशा तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. वारा जहांगीर गावातील संतोष लांभाडे( वय ४२ ), त्यांची पत्नी कलावती लांभाडे ( वय ३५) आणि मुलगा ईश्वर लांभाडे ( वय १२ वर्षे ) असे तिघे जण गोगरी येथे एका विवाह सोहळ्यासाठी गेले होते. विवाह सोहळ्यावरून दुचाकीने ते आपल्या गावी जाताना त्यांच्या दुचाकीला वाशिमवरून मंगरूळपीरच्या दिशेने आंबे घेऊन जात असलेल्या मिनी ट्रकने जोरदार धडक दिली.

# दूध भेसळ रोखण्यासाठी फडणवीसांचा प्लॅन, प्रशासनाला कडक सूचना

हिंदू प्रकाशवार्ता। प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाने टेस्ट स्ट्रीप तयार केली आहे. मात्र, दुधातील भेसळ रोखण्यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड आणि आयआयटी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून यंत्रणा तयार करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. राष्ट्रीय डेयरी विकास बोर्डचे अध्यक्ष मीनेश शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या कामकाजाची माहिती दिली.

**दूध भेसळ रोखण्यासाठी विशेष टेस्ट स्ट्रिप विकसित**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात सध्या ४० टक्के दूध संघटित क्षेत्रातून प्रक्रिया केले जाते. तर उर्वरित दूध असंघटीत क्षेत्रातून येत असल्याने भेसळीचे प्रमाण मोठया प्रमाणावर आढळते. त्यामुळे अधिकाधिक उत्पादक आणि गावांना संघटित डेअरी व्यवस्थेत आणण्यावर शासनाचा भर आहे. देशभरात ७५ हजार नवीन गावे सहकारी व्यवस्थेत जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळण्यासोबतच भेसळ रोखण्यास मदत होणार आहे. दूध भेसळ रोखण्यासाठी विशेष टेस्ट स्ट्रिप विकसित करण्यात आली असून ही स्ट्रिप यूरिया तसेच इतर भेसळ घटक ओळखण्यास सक्षम असून पुढील सहा महिन्यांत ती पूर्णपणे कार्यान्वित होईल. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**उदगीर येथे महानंदचे नवीन डेअरी प्लांट उभारण्यात येणार**

मीनेश शाह म्हणाले की, राज्य शासनाने केलेल्या सहकार्यामुळे महानंदच्या पुनरुज्जीवनाला गती मिळाली असून सुमारे ७८ टक्के काम पूर्ण झाले आहे. ३ लाख लिटर क्षमतेचा नवीन ग्रीनफिल्ड डेअरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. महानंदा परिसरात सिग्नेचर पार्लर आणि अत्याधुनिक इमारत उभारण्यात आल्या आहेत.

आरे आणि महानंदा यांच्या ब्रँडचे रिलाँचिंग लवकरच करण्यात येईल. मुंबईतील आरे कॉलनीमध्ये कंप्रेस्ड बायोगॅस प्रकल्प तसेच उदगीर येथे महानंदचे नवीन डेअरी प्लांट उभारण्यात येणार आहे.

नागपूरमधील बुटीबोरी येथे अत्याधुनिक डेअरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाच्या वतीने विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यात दुधसंकलन वाढविण्यात येत आहे. दुध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या चाचणीसाठी केंद्र शासनाच्या एनपीडीडी योजनेअतंर्गत महानंद डेअरीमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली असल्याचे मीनेश शाह यांनी सांगितले.

### घाटीतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या संयमाचा अंत

# ५ मे रोजी गळ्यात मडकं, पाठीला झाडू बांधून 'प्रहार' आंदोलन करणार

### अधिष्ठात्यांवर मनमानी कारभाराचे आरोप; लाड-पागे समितीच्या नियुक्त्यांवरून संताप




हिंदू प्रकाशवार्ता। प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगरः** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप करत, प्रहार जनशक्ती पक्ष कर्मचारी संघटनेने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या ५ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गळ्यात मडकं आणि पाठीला झाडू बांधून अनोखे आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने निवेदनाद्वारे दिला आहे.



राजेंद्र पोहाल

● **अधिष्ठात्यांवर गंभीर आरोप**

प्रहारचे शहराध्यक्ष राजेंद्र पोहाल यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात घाटीचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. 'प्रशासन मनमानी कारभार करत असून कर्मचाऱ्यांना बदलीची भीती दाखवणे आणि निलंबनाच्या धमक्या देणे असे प्रकार सुरू आहेत. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी वारंवार पत्रव्यवहार करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे,' असे निवेदनात म्हटले आहे.

● **नियुक्त्यांमध्ये फेरफार आणि लाड-पागे समितीचा वाद**

लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार होणाऱ्या भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर फेरफार झाल्याचा संशय संघटनेने व्यक्त केला आहे.

● **यादीत घोळः** गेल्या वर्षी अग्रक्रमावर असलेल्या उमेदवारांची नावे सध्याच्या यादीत मागे ढकलण्यात आली आहेत.

● **मागणीः** महानगरपालिकेच्या धर्तीवर घाटीतील उर्वरित १७० उमेदवारांना तात्काळ नियुक्ती द्यावी.

● **कामाचा बोजाः** नवीन ३५७ भरतीतील कर्मचाऱ्यांकडून जुन्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच कामाची अपेक्षा ठेवली जात असल्याने कामाचा ताण वाढत आहे.

● **निवासस्थानांची दुरवस्था आणि निधीचा प्रश्न :**

कर्मचारी निवासस्थानांच्या दुरवस्थेबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. दरवर्षी देखभालीसाठी निधी उपलब्ध होऊनही गेल्या तीन वर्षांत कोणतीही दुरुस्तीची कामे झालेली नाहीत. हा निधी नेमका कुठे खर्च झाला? असा सवाल उपस्थित करत संबंधित सुरक्षा अधिकाऱ्याची बदली करण्याची मागणीही संघटनेने केली आहे.


**प्रमुख मागण्याः**

- लाड-पागे समितीतील प्रलंबित उमेदवारांची तात्काळ भरती.
- जुन्या कर्मचाऱ्यांना वेळेवर पदोन्नती मिळणे.
- कर्मचारी निवासस्थानांची तातडीने दुरुस्ती.
- उद्धट वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई.

**बच्चू कडू आंदोलनात सहभागी होणार**

या सर्व प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी आणि प्रश्न मार्गी लावावेत. अन्यथा, ५ मे २०२६ रोजी तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे. य आंदोलनामध्ये प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चूभाऊ कडू हे स्वतः उपस्थित राहतील,' असा इशारा राजेंद्र पोहाल यांनी दिला आहे.

# पूरग्रस्त भागातील तरुणांसाठी नाविन्यपूर्ण ड्रोन पायलट प्रशिक्षण



हिंदू प्रकाशवार्ता। प्रतिनिधी

**नांदेड :** पूरग्रस्त भागातील तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी यांच्या विशेष पुढाकारातून एक नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. या अंतर्गत दक्षा RPTO, उद्यमिता लर्निंग सेंटर येथे पूरग्रस्त भागातील २० तरुणांना ड्रोन पायलट प्रशिक्षण देण्यात आले.

मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे मुखेड तालुक्यातील अनेक गावे पाण्याखाली गेली होती. या नैसर्गिक आपत्तीमुळे स्थानिक नागरिकांचे जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले. या पार्श्वभूमीवर प्रभावित तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्कृती संवर्धन मंडळाने जिल्हाधिकाऱ्यांकडे विशेष पाठपुरावा केला होता. त्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे हा उपक्रम प्रत्यक्षात साकार झाला.

या प्रशिक्षणामध्ये हसनाळ, रावणगाव, भिंगोली आणि भाटापूर या गावांतील एकूण २० तरुणांनी सहभाग घेतला. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थ्यांना डीजीसीए कडून १० वर्षांसाठी ड्रोन ऑपरेटर परवाना प्रदान करण्यात आला आहे. अशा प्रकारचा नाविन्यपूर्ण उपक्रम जिल्ह्यात पहिल्यांदाच घेण्यात आला आहे.

प्रशिक्षणानंतर संबंधित तरुणांना ड्रोन पायलट म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, यासाठी त्यांना दक्ष RPTO कडून मार्गदर्शन देखील दिले जाणार आहे. याशिवाय, ड्रोनद्वारे शेती फवारणीसारखा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याची संधीही त्यांना प्राप्त झाली आहे.

ग्रामीण भागातील तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रोजगारक्षम बनविण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा हा विशेष उपक्रम आहे.

# नांदेडमध्ये दिशा समितीच्या बैठकीत जलजीवन मिशन, महावितरण, रस्ते विकासासह विविध महत्वाच्या विकास कामांचा आढावा

हिंदू प्रकाशवार्ता। प्रतिनिधी

**नांदेड :** जिल्ह्यातील विविध विकास योजना तसेच विकास कामांबाबत जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती ( दिशा ) बैठकीत सर्वंकष आढावा घेण्यात आला. विकास योजना, उद्दीष्टांच्या अंमलबजावणीसाठी विविध विभागांकडून काटेकोर नियोजन करण्यात यावेत, असे निर्देश दिशा समितीचे अध्यक्ष तथा खासदार रविंद्र चव्हाण यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन येथे आज दिशा समितीच्या बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार शिवाजी काळगे, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार आनंदराव तिडके, आमदार श्रीजया चव्हाण, महापौर कविता मुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, लोहा व भोकर नगराध्यक्ष यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी आदींची उपस्थिती होती.

या बैठकीत सुरवातीला २४ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली. जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीच्या विविध योजनेच्या कामाचा विस्तृत आढावा घेण्यात आला.

प्रत्येक विभागाने बैठक झाल्यानंतर अनुपालन अहवाल समितीला सादर केला पाहिजे अशा सूचना खासदार रविंद्र चव्हाण यांनी सुरवातीला सर्व विभागांना केल्या. त्यानंतर जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या पुर्ण, अपूर्ण कामाबाबतची यादी सादर करणे, स्त्रोत नाही तिथे काम झाले का, निधीचा प्रश्न, आतापर्यत किती कामे पूर्ण झाली याबाबत खासदार अशोक चव्हाण यांनी विचारणा केली. याबाबत जलजीवन मिशन योजनेबाबतचा प्रश्न लवकरच मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबतच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

जिल्ह्यात व शहरात सध्या महावितरणच्या अनेक समस्याबाबत सर्वच लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे लक्ष वेधले. लोडशेडींगसह अचानक विज गायब होण्याच्या घटनेने नागरिक त्रस्त असून याबाबत महावितरणने कायमस्वरुपी समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना कराव्यात. तसेच येत्या ५ वर्षाच्या कालावधीत शहरात सर्व केबल अंडरग्राऊड करण्याचे काम पूर्ण व्हावे अशा सूचना खासदार रविंद्र चव्हाण यांनी दिल्या.

विजेच्या समस्या सोडविण्याबाबत तरोडा भागात ८ नवे ट्रान्सफार्मर बसविले असून इतर भागातही ट्रान्सफार्मर बसविण्याची कार्यवाही सुरु असल्याचे महावितरण विभागाकडून सांगण्यात आले. यासह इतरही समस्या लवकरच सोडविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात येईल व सर्व समस्यांवर उपाययोजना करण्यात येईल, असे महावितरणचे अधिक्षक अभियंता यांनी सांगितले.

यावर्षी नांदेड जिल्ह्याला प्रधानमंत्री पीक विमा योजनेत ८१३ कोटी रुपयांचा पिकविमा परतावा मंजूर झाला आहे. याबाबत जिल्हाधिकारी व कृषी विभागाचे यावेळी अभिनंदन केले. खताचे लिंकीग, भरारी पथके, खताचा तुटवडा होवू नये यासाठी खबरदारी, खताचा पुरेसा साठा, युरियाचा पुरवठा, मागणी प्रमाणे उपलब्धता, विक्री या विविध विषयांचा यावेळी आढावा घेण्यात आला. लिंकीगमुळे शेतकऱ्यांना खताच्या बाबतीत त्रास होवू नये याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना कृषी विभागाला दिल्या.

शहराला दैनंदिन पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, अमृत मिशन २ यासह विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. नुकतेच इस्लामपुरा भागात चार शाळकरी मुलांचा खड्डयात पडून मृत्यू झाला याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती खासदार रविंद्र चव्हाण यांनी महापालिकेकडून घेतली. या मृत्त मुलांना योग्य ती मदत मिळेल याची काळजी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

महामार्गाच्या पायाभुत सुविधा, दूरसंचार पायाभूत सुविधा कार्यक्रम, राष्ट्रीय महामार्ग, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, अमृत मिशन २.०, पाटबंधारे, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पीएम सुर्यघर योजना, रेल्वे विभाग यासह सर्व योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. अध्यक्ष खासदार रविंद्र चव्हाण यांनी नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी व विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित यंत्रणेने त्वरीत कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले. या शिवाय आवश्यकतेनुसार महत्वाच्या विभागांचा आढावा स्वतंत्र बैठक घेवून घेण्यात येईल अशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

बारूळ धरण सिमेंट कॅनल बांधकाम सुरु असून संबंधित बांधकाम करत असताना नवीन मुरूम ऐवजी बाजूच्या शेतातील माती काढून कॅनल बांधकाम चालू आहे. भविष्यात शेतीचे नुकसान होऊ नये या करिता धानोरा, कांडाळा, होटाळा येथील शेतकऱ्याची उखरलेली जमीन भरून देण्यात यावी असे खासदार डॉ. काळगे यांनी सांगितले.

यावेळी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी रस्ते विकास, वीज समस्या, रस्ते अपघात, खताचा तुटवडा, खत लिंकींग याबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. शिवाजी काळगे, खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार आनंदराव तिडके, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार श्रीजया चव्हाण यांनी त्यांच्या मतदारसंघातील विविध समस्या सोडविण्यासाठी विविध विभागामार्फत करण्यात येणार कामे व सुरु असलेल्या विकास कामांबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा करुन उपाययोजनाबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या.

# मनपाकडून सर्वसाधारण सभेत साप्ताहिक व यूट्यूब माध्यमांना प्रवेशबंदी; पत्रकारांमध्ये तीव्र नाराजी

## लोकशाहीत माध्यमांमध्ये भेदभाव नको : अब्दुल कय्यूम

हिंदू प्रकाशवार्ता। प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगरः** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनाच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत साप्ताहिक वृत्तपत्रे आणि यूट्यूब चॅनलच्या प्रतिनिधींना प्रवेश नाकारण्यात आल्याने तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. प्रशासनाचा हा निर्णय अन्यायकारक असून लोकशाहीच्या तत्त्वांना हरताळ फासणारा असल्याची भावना 'व्हॉईस ऑफ मीडिया' संघटनेने व्यक्त केली आहे. सोमवारी पार पडलेल्या छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनाच्या सर्वसाधारण सभेमध्ये साप्ताहिक वृत्तपत्रे आणि यूट्यूब चॅनलच्या प्रतिनिधींना प्रवेश करण्यापासून सुरक्षा रक्षक आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी रोखले होते. यावेळी अनेक संबंधित माध्यमांच्या पत्रकारांनी निषेध नोंदवलेला होता.



अब्दुल कय्युम

**यूट्यूब माध्यमाची प्रभावी भूमिका दुर्लक्षित?**

आजच्या डिजिटल युगात यूट्यूब चॅनल हे सर्वात वेगवान माध्यम म्हणून समोर आले आहे. काही मिनिटांतच महत्त्वाच्या घडामोडी जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम ही माध्यमे करत आहेत. 'आम्ही जनतेचा प्रभावी आवाज आहोत, तरीही आम्हाला अशा महत्त्वपूर्ण बैठकांपासून दूर ठेवणे अनाकलनीय आहे,' असे मत यूट्यूब व साप्ताहिक माध्यमांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केले आहे.

**भेदभाव करणे लोकशाहीमध्ये विसंगत : अब्दुल कय्यूम**

या वादावर 'व्हॉईस ऑफ मीडिया' संघटनेचे साप्ताहिक विंगचे प्रदेशाध्यक्ष अब्दुल कय्यूम यांनी प्रशासनाच्या भूमिकेचा कडक शब्दांत निषेध केला आहे. त्यांनी स्पष्ट केले कीः 'माध्यमांमध्ये 'लहान-मोठा' असा भेदभाव करणे ही लोकशाहीला धरून नाही. महानगरपालिका प्रशासनाने सर्व माध्यम प्रतिनिधींना सर्वसाधारण सभेमध्ये समान प्रवेश देणे आवश्यक आहे. पारदर्शकता जपण्यासाठी सर्व माध्यमांना समान वागणूक मिळायलाच हवी.'

**आंदोलनाचा इशारा**

प्रशासनाच्या या धोरणामुळे साप्ताहिक आणि यूट्यूब पत्रकारांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. प्रशासनाने या निर्णयाचा तात्काळ फेरविचार करून सकारात्मक पाऊल उचलावे, अन्यथा तीव्र आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल, असा इशाराही माध्यम प्रतिनिधींनी दिला आहे.

# शासन आणि युनिसेफमार्फत खेळ,चर्चा आणि संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लिंग समभावाचे धडे

हिंदू प्रकाशवार्ता। प्रतिनिधी

**मुंबई :** लिंग भेद दूर करण्यासंदर्भात राज्य शासनाच्या सहाय्याने अंगाई आणि युनिसेफतर्फे लिंग समभाव या विषयावर विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना प्रबोधनपर प्रशिक्षण दिले जात आहे. युनिसेफ आणि अंगाई (UNGEI) यांच्या सहकार्याने धाराशिव जिल्ह्यात देशात पहिल्यांदा प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या लिंग समभाव शिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण मुलींच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून येत आहे. खेळाधारित शिक्षण, संवाद आणि सहभागात्मक उपक्रमांच्या माध्यमातून किशोरवयीन मुला-मुलींमध्ये समानतेची जाणीव निर्माण होत आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची जिल्हा संस्था डाएटच्या (डीआयईटी) सहकार्याने राबवण्यात आला. संपूर्ण भारतामध्ये केवळ धाराशिव जिल्ह्यात हा प्रकल्प राबवला गेला असून त्यामध्ये १२० शाळा, ८०० हून अधिक शिक्षक आणि १८,००० हून अधिक मुलांचा सहभाग होता. धाराशीमध्ये प्रायोगिकतत्वावर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील धाराशिवमध्ये, अंगाई-युनिसेफतर्फे लिंग समभाव हा विषय खेळाधारित शिक्षणाद्वारे किशोरवयीन मुले-मुली, शिक्षक आणि गावातील समुदायांना शिकवण्यात आला. मीना राजू मंच हा इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आला असून लिंग समभावाशी संबंधित विविध पैलूंची माहिती त्यांना करून देण्यात आली. त्यामध्ये संवाद, खेळ, चर्चा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमाला स्थानिक संस्था स्वयं शिक्षण प्रयोग (एसएसपी), कोरो आणि मावा यांचा सहभाग होता.'मी माझ्या आईशी आणि काकूशी याबद्दल बोलले. त्यांनाही हा भेदभाव जाणवला नव्हता. त्या जुन्या परंपरेनुसार मुलींना कमी अन्नाची गरज असते, असंच मानून चालल्या होत्या. पण मी त्यांना समजावून सांगितले की आम्हा दोघांनाही समान अन्नाची गरज आहे, कारण आम्ही



दोघेही समान कामं करतो,' आर्णी गावातील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या प्रज्ञा पाटोळे हिने स्वअनुभव कथन केला. शासन आणि युनिसेफ, अंगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उपक्रमामुळे मुलींना लिंग समभावाचे शिक्षण मिळाले. यामुळे विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या सहायाने कुटुंबीयांच्या विचारसरणीत सकारात्मक फरक पडत आहे.

या उपक्रमामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले आहे. अनेक मुली उच्च शिक्षण घेऊ इच्छितातष्ठप्रज्ञा संवाद साधताना म्हणाली, भविष्यात डॉक्टर बनून विशेषतः महिलांच्या आरोग्य, पोषण आणि मासिक पाळी स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याची इच्छा आहे. समाजात अजूनही दुर्लक्षित असलेल्या या विषयांवर काम करण्याचा तिचा निर्धार आहे. आज प्रज्ञा गावातील बालसभा, शाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये लिंग समभावाबाबत जागृती करते. 'बदल सोपा नाही, पण लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे,' असे ती ठामपणे सांगते. एका सर्वसामान्य कुटुंबातून आलेली ही मुलगी आता समानता आणि न्याय्य समाजाचे स्वप्न पाहत आहे आणि ते पूर्ण करण्यासाठी धाडसाने पुढे जात आहे. या उपक्रमामुळे समाजात स्त्री-पुरूष समानतेचे धडे बालपणी मिळत असल्याचे लवकरच मोठ्या प्रमाणात बदल घडू शकेत असा विश्वास शासन आणि संस्थांच्या माध्यमातून व्यक्त केला जात आहे.

# स्वामी विवेकानंद कॉलेजसमोर 'इथे कचरा टाका' पाटीच उलटी; मनपाचा निष्काळजीपणा उघड

## स्वच्छतेच्या दाव्यांना तडा; अयोग्य नियोजनामुळे कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह, नागरिकांत संताप

हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर | महानगरपालिकेच्या स्वच्छता मोहिमांच्या दाव्यांना प्रत्यक्ष कामकाजात मात्र धक्का बसत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. स्वामी विवेकानंद कॉलेजसमोर 'इथे कचरा टाका' अशी सूचना देणारी पाटीच उलट्या अवस्थेत ठेवण्यात आल्याने निष्काळजीपणासोबतच नियोजनाच्या अभावाचेही स्पष्ट दर्शन घडत आहे.



छत्रपती संभाजीनगर : शहर स्वच्छतेसाठी विविध उपक्रम, मोहिमा आणि दंडात्मक कारवायांची घोषणा करणाऱ्या महानगरपालिकेच्या कामकाजातील विसंगती पुन्हा एकदा उघड झाली आहे. स्वामी विवेकानंद कॉलेजसमोरील कचराकुंडी परिसरात 'इथे कचरा टाका' अशी सूचना देणारी पाटीच उलट्या अवस्थेत ठेवण्यात आल्याचे समोर आले असून, यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

सदर प्रकार हा केवळ दुर्लक्षाचा नमुना नसून, संबंधित यंत्रणेच्या बेपर्वाईचे प्रतीक असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या घटनेमुळे नागरिकांत चिंता व्यक्त केली जात असून, मनपाच्या कामकाजाबाबत तीव्र संतापही व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे प्रशासनाच्या जबाबदारीवर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

याशिवाय, कचराकुंड्यांची बसवणूकही योग्य पद्धतीने न करता ती केवळ ठेवण्यात आल्याचे दिसून येते. कुंड्यांमध्ये साचलेला कचरा, तसेच परिसरात विखुरलेली घाण यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. महाविद्यालयासमोरचा हा परिसर असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची वर्दळ असते. अशा ठिकाणी अस्वच्छता पसरल्यास आरोग्याच्या दृष्टीने धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महानगरपालिकेकडून स्वच्छतेबाबत सातत्याने जनजागृती केली जात असली, तरी प्रत्यक्षात मूलभूत सुविधा आणि अंमलबजावणीतील त्रुटी यामुळे त्या प्रयत्नांवर पाणी फिरताना दिसत आहे. स्वच्छतेच्या घोषणांपेक्षा कृतीत सातत्य आणि जबाबदारीची जाणीव अधिक महत्त्वाची असल्याचे या घटनेतून अधोरेखित होते.

या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने या प्रकाराची दखल घेऊन योग्य ती दुरुस्ती करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. स्वच्छ शहराचा दावा केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात उतरावा, हीच सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

# सोयगावात संतांच्या समर्थनार्थ भव्य मोर्चा; आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात संत समाज आक्रमक

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

सोयगाव,दि.२३ एप्रिल | सनातन हिंदू धर्मातील पूजनीय संतांविषयी करण्यात आलेल्या कथीत आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ संत समाज,वारकरी संप्रदाय आणि सकल हिंदू समाज मोठ्या संख्येने एकवटला.विकास लवांडे यांच्या विरोधात संतप्त जनसमुदायाने दि.२३ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता सोयगाव तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढत प्रशासनाला निवेदन सादर केले. या मोर्चादरम्यान संतांविषयी केलेल्या वक्तव्यामुळे धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करत आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली.आंदोलन शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले असले,तरी संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी,अशी ठाम मागणी करण्यात आली.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह.भ.प.सुधन्वाजी महाराज केनेकर यांनी केले.यावेळी ह.भ.प.निवृत्ती महाराज मोहने, ह.भ.प.जितेंद्र महाराज पंडित,ह.भ.प.गोपाल महाराज पवार,ह.भ.प.कुमारी जान्हवी दीदी सोनवणे तसेच ह.भ.प. पारस महाराज जैन यांनी आपल्या मनोगतातून संत परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत संतांचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगितले.

मोर्चात परिसरातील वारकरी बांधव व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.ह.भ.प.निलेश महाराज राजपूत, ह.भ.प.शरद महाराज पवार,ह.भ.प.किरण महाराज यांच्यासह अखिल हिंदू समाजातील विविध घटकांनी एकजूट दाखवत निषेधात सक्रिय सहभाग नोंदवला.सोयगाव तहसील कार्यालयात निवेदन सादर करत संबंधित व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.या घटनेमुळे सोयगाव परिसरात मोठी खळबळ उडाली असून सामाजिक व धार्मिक स्तरावर याचे तीव्र पडसाद उमटत आहेत.

## संक्षिप्त वार्ता



संभाजीनगर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड यांची भेट घेऊन अजिंठा घाट हा नेहमी बंद पडत असल्यामुळे त्यामध्ये तात्काळ उपाययोजना कराव्यात. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली . यावेळी इद्रिस मुलतानी,पंचायत समितीचे सभापती उत्तम चव्हाण, पंचायत समितीचे सदस्य राहुल राठोड, योगेश शिंदे,कृष्णा सिरसाठ,संजय चव्हाण,योगेश महाकाळ,अशोक भिडे,भाजपा सरचिटणीस शुभम अन्वीकर उपस्थित होते.

### समाजकल्याण कर्मचारी संघटनेचा तिसऱ्यादिवशीही कामबंद आंदोलन



छत्रपती संभाजीनगर | राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांनी मंगळवारपासून बेमुदत संप पुकारला आहे. संपाच्या तिसऱ्या दिवशी गुरूवारीही पुणे येथील समाज कल्याण कर्मचारी संघटना (गट-क) च्या छत्रपती संभाजीनगर येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विभागीय आयुक्त व सहाय्यक आयुक्त कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यावेळी शासनाने तत्काळ कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मार्गी लावाव्यात, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. यावेळी वरिष्ठ समाज कल्याण निरिक्षक सीमा सिंधीकर, समाजकल्याण निरीक्षक विकास बमणे, जावेद खान, बेबी दांडगे, संतोष वाघ, मनोज बोहरा, कृष्णा महाडिक, अजय जारवाल, राजू जंगाळे, देवधन जंगाळे , विजय नाडे, निसार शहा, संतोष आडे आदी कर्मचारी उपस्थित होते.

### स्वाधारच्या अर्जातील त्रुटीची 30 एप्रिलपर्यंत पुर्तता करा

छत्रपती संभाजीनगर | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या लाभासाठी ज्या विद्यार्थ्यांनी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन अर्ज केले होते, परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जात तपासणीदरम्यान कागदपत्रांच्या त्रुटी आढळल्यात, अशा विद्यार्थ्यांचे स्वाधारचे अर्ज सेंडबॅक (परत) ऑनलाईन करण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज सेंडबँक आले आहेत, त्यांनी तत्काळ त्रुटींची पुर्तता येत्या ३० एप्रिलच्या आत ऑनलाईन करावी. ज्या विद्यार्थ्यांनी ३० एप्रिलच्या आत त्रुटीची पुर्तता न केल्यास ते स्वाधारचे अर्ज अपात्र करण्यात येतील. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना अर्ज सेंडबॅक आले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी त्रुटी पुर्तता केल्यानंतर अर्जाची प्रत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन खोकडपुरा येथे आणून द्यावीत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त रवींद्र शिंदे, वरिष्ठ समाज कल्याण निरिक्षक सीमा सिंदीकर यांनी केले आहे.

### सीबीएसई परीक्षेत संस्कार शिंदेचे यश



छत्रपती संभाजीनगर | मुकुंदवाडी येथील रहिवासी युनिव्हर्सल हायस्कुलचा विद्यार्थी संस्कार संतोष शिंदे याने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी बोर्ड परीक्षेत 89.90 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाला आहे. त्याच्या यशाबदल सर्वत्र त्याचे अभिनंदन होत आहे.

### मोराची निर्घृण हत्या, दोन तरुणांना नागरिकांकडून चोप

चितेगाव : पैठण तालुक्यातील चितेगाव–बोकड जळगाव रोडवरील पांगरा शिवारात अत्यंत संतापजनक घटना घडली आहे. दोन तरुणांनी राष्ट्रीय पक्षी असलेल्या मोराला पकडून त्याच्या डोक्यात काठी मारत निर्घृणपणे ठार केल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्यक्षदर्शी स्थानिक नागरिकांनी सांगितले की, हे दोन्ही तरुण मोराला मारत असताना काही ग्रामस्थांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यानंतर संतप्त नागरिकांनी तात्काळ त्या तरुणांना पकडले आणि त्यांना चांगलाच चोप दिला.

# 'मानसशास्त्र'चे विद्यार्थी करणार समपुदेशनाचे काम

## मानसशास्त्र विभागाचा दहा कंपन्यांसमवेत सामंजस्य करार

हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मानसशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना विविध स्वयंसेवी संस्थासमवेत काम करता येणार आहे. या संदर्भात शहरातील नऊ संस्थासोबत गुरुवारी सामंजस्य करार करण्यात आला आहे. अलीकडच्या काळात मोठे महत्प प्राप्त झालेल्या 'मानसशास्त्र' विषयाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. या विभागाचे विद्यार्थी शहरातील विविध स्वयंसेवी सस्थाच्या, मानसोपचार रुग्णालया सोबत समुपदेशनाचेही काम करणार आहेत.

मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली मानसशास्त्र विभागात 'एईडीची' अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. तसेच एम.ए.मानसशास्त्र व 'क्लिनीकल सायकॉलाजी' हा पदविका कोर्स सुरु आहे. तसेच आगामी शैक्षणिक वर्षापासून 'रिहॅबीकेशन सायकॉलॉजी' व 'क्लिनीकल सायकॉलॉजी' या विषयाचे चार कोर्स सुरु होणार आहेत. या पार्श्वभूमीवर विभागाच्यावतीने मानसिक आरोग्य संदर्भात काम करणाऱ्या नऊ संस्थासोबत गुरुवारी (दि.१६) सामंजस्य कररावर स्वाक्षरी करण्यात आली. कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, विभागप्रमुख डॉ.अपर्णा अष्टपुत्रे यांच्यासह या संस्थाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. सोसायटी फॉर सायकोटिक अपडेट अ‍ॅण्ड रिसर्च, मेंटल हेल्थ सेंटर, प्रणित सायकॉलॉजीकल कौन्सिलिंग सेंटर, एमएमआर ट्रस्ट संचलित कमलनयन बजाज हॉस्पिटल, के पॉन्ड न्युरो सपोर्ट, विंहग विशेष मुलांची शाळा,सावित्रीबाई फुले महिला एकात्मता समाज, आई फाऊडेशन गेवराई, आस्था फाउंडेशन बसंत प्रभा विश्व या नऊ संस्थाचा समावेश आहे. या संस्थाचे प्रतिनिधी यावेळी बजाज हॉस्पिटलचे सीईओ डॉ.जार्ज नोवल फर्नांछिडस, डॉ.अजय रोटे, देवहुती न्यायाधिश, डॉ.वर्षा वैद्य, अदिती थाईल, आस्था फाऊंडेशनचे संगवेडकर यांची उपस्थित होते. या कराराच्या माध्यमातून दोन्ही संस्थामध्ये विद्यार्थी, शिक्षक यांच्यात अदान-प्रदान करण्यात येणार आहे. तसेच आठ पैकी तीन सत्राची इंटर्नशिप ही मुले या संस्थामध्ये करणार आहेत. बी.ए.मानसशास्त्र (एईडीपी) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे. सार्वजिक संस्थेच्यावतीने प्रतिनिधी तर विद्यापीठाच्यावतीने मा.कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांनी करारावर स्वाक्षरी केली.

# जि.प. शिक्षकाचा 'महाराष्ट्र श्रीमान' किताब; कन्नडमध्ये सत्कार



हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

कन्नड | जि.प. भटाना शाळेतील शिक्षक विशाल म्हात्रे यांनी शरीरसौष्ठव क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत "महाराष्ट्र श्रीमान (मास्टर) 2025-26" हा किताब पटकावला आहे. कल्याण येथे दि. ११ एप्रिल रोजी झालेल्या "महाराष्ट्र श्री" स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली.

त्यांच्या या यशाबद्दल कन्नड येथील ब्लु स्टार हेल्थ क्लबतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना म्हात्रे यांनी तरुणांना आरोग्याबाबत सजग राहण्याचे आवाहन केले. "जगातील सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे आपले शरीर असून, त्याची काळजी घेणे गरजेचे आहे. आजची तरुणाई व्यसनांच्या आहारी जात असून आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे कमी वयातच विविध आजारांचा धोका वाढत आहे," असे ते म्हणाले. शरीरयष्टी घडवण्यासाठी वयाचे कोणतेही बंधन नसून जिद्द व सातत्य आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास ब्लु स्टार हेल्थ क्लबचे संचालक धीरज नगराळे, संजय सोनवणे, अमोल साळवे, विशाल मोरे, निलेश गायकवाड, कृष्णा खरे, दयासेन नगराळे, धीरज भोरे, दिनेश आव्हाळे, अमन गुप्ता, कामरान शेख आदी उपस्थित होते.

# एमजीएममध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा संपन्न



हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर | महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ज्या विद्यार्थ्यांनी सॉलिड वर्क्स प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले आहे आणि जे विद्यार्थी गेट परीक्षेत पात्र ठरले आहेत, अशा गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते आईनस्टाईन सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सन्मान सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व सर्व संबंधित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

या कार्यक्रमास सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे (सिपेट) प्रवीण कुमार, सुबोध पवार व हर्षल दाऊद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.विजया मुसांडे, विभागप्रमुख डॉ.एम. एस.कदम, विभागप्रमुख डॉ.दीपा देशपांडे यांच्यासह गेट परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

यावेळी बोलताना सिपेटचे प्रवीण कुमार म्हणाले, स्पर्धात्मक परीक्षांमधील यशासोबतच विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कौशल्येही आत्मसात करणे आवश्यक आहे. सॉलिड वर्क्स प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये ३ डी डिझाईन, मॉडेलिंग व प्रॉडक्ट डेव्हलपमेंटसारखी उद्योगसुसंगत कौशल्ये विकसित होतात, ज्यामुळे त्यांच्या रोजगाराच्या संधी अधिक बळकट होतात.

# महाराष्ट्रात पहिल्यांदाच चारही नगरसेवक एकाच नंबरवर होणार उपलब्ध

# प्रभाग 23 च्या हेल्पलाईनचे मंत्री अतुल सावेंच्या हस्ते उदघाटन

## नागरीकांच्या तक्रार निवारणसाठी ऐतिहासिक पाऊल

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर | दि. २३ : महानगर पालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक २३ च्या हेल्पलाईन सेवेला अधिक सक्षम करत स्वयंचलित कॉलिंग सिस्टमचा प्रारंभ महाराष्ट्र राज्याचे इतर मागास व बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री अतुलजी सावे यांच्या हस्ते भाजपा कार्यालयात करण्यात आला.

प्रभाग क्रमांक २३ मधून भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक म्हणून डॉ.प्रमोद राठोड, बालाजी मुंढे, सत्यभामा शिंदे, आणि सुरेखा गायकवाड विजयी झाले. नागरिकांशी थेट संपर्क व्हावा आणि प्रभागातील तक्रारीचे तातडीने निराकरण व्हावे यासाठी विद्यमान हेल्पलाईन सेवेला अधिक सक्षम करत स्वयंचलित कॉलिंग प्रणालीचा प्रारंभ करण्यात आला आहे. या नव्या प्रणाली मुळे नागरिकांना आपल्या हक्काच्या नगरसेवकांकडून आपली कामे सहजरीत्या करता येतील आणि चांगल्या सुविधा उपलब्ध करून देता येतील असे मंत्री सावे यांनी सांगत या हेल्पलाईन बाबत प्रभाग क्रमांक 23 च्या सर्व नगरसेवकांचे अभिनंदन केले आहे.






हेल्पलाईन क्रमांक 9823871111 यावर नागरिकांनी संपर्क केल्यास क्रमांक 1 वर आपली तक्रार नागरिक नोंदवू शकतील. क्रमांक 2 दाबल्यास भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते तथा नगरसेवक डॉ. प्रमोद प्रल्हाद राठोड यांच्याशी, 3 क्रमांक दाबल्यास नगरसेवक बालाजी मुंढे यांच्याशी, क्रमांक 4 दाबल्यास नगरसेविका सत्यभामा दामूअण्णा शिंदे यांच्याशी तर 5 क्रमांक दाबल्यास नगरसेविका सुरेखा ताराचंद गायकवाड यांच्याशी नागरिकांना थेट संपर्क साधता येईल. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या स्वयंचलित कॉलिंग प्रणाली मुळे नागरिकांना त्यांच्या तक्रारीचे अधिक प्रभाविपणे तातडीने निराकारण करून चांगल्या सेवा देता येतील आणि प्रभाग अधिक विकसनशील होईल असा विश्वास यावेळी नगरसेवक डॉ.प्रमोद राठोड यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा शहर अध्यक्ष किशोर शितोळे, महापौर समिर राजूरकर, सभापती अनिल मकरिये ,नगरसेवक बालाजी मुंढे, नगरसेविका सत्यभामा दामुअण्णा शिंदे, नगरसेविका सुरेखा ताराचंद गायकवाड आदीची उपस्थिती होती.

# व्यक्तिमत्व विकासासाठी ग्रंथवाचन आवश्यक : डॉ. नामदेव सानप

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर | ग्रंथ सतत ज्ञान व संस्कार देतात. वाचक, विद्यार्थी यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी सतत ग्रंथवाचन करावे असे, प्रतिपादन प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी केले. समर्थ नगरमधील शासकीय विभागीय ग्रंथालय व मॉडर्न संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शनात ते बोलत होते.

ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन प्रज्ञा सोनवणे यांच्या हस्ते झाले. मंडळ कृषी अधिकारी निवृत्ती जोरी प्रमुख अतिथी, तर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे अध्यक्षस्थानी होते.



### वाचन सुविधांचा लाभ घ्यावा

विभागीय ग्रंथालयात ग्रंथालयीन सेवा व कामकाजात ई-ग्रंथालय आज्ञावलीचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. शहर व परिसरातील नागरिकांनी शासकीय विभागीय ग्रंथालयाच्या वाचन सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी यावेळी केले. कार्यक्रमास शासकीय विभागीय ग्रंथालय व सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयातील कर्मचारी, वाचक, सभासद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजच्या सोशल मिडीयाच्या जमान्यात प्रत्येकाला रील्सचे व्यसन जडले आहे. वाचन हाच त्यापासून मुक्त होण्याचा उपाय असून, ग्रंथालये हे अशा रील्सच्या व्यसनापासून मुक्त करण्याचे डिटॉक्स सेंटर असल्याचे सुनील हुसे यांनी सांगितले. जगात माता-पित्यानंतर आपल्याकडून कशाचीही अपेक्षा न करता फक्त देत राहणारे गुरू म्हणजे पुस्तके असून, पुस्तकांशी केलेली मैत्री चांगले मित्रत्व निभावते असे, निवृत्ती जोरी म्हणाले. सूत्रसंचालन सुधाकर गायधनी, तर आभारप्रदर्शन गोविंद खेडकर यांनी केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक **श्री. रोहित विकास पाटील** यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर-431001 येथून प्रकाशित केले. **संपादक : रोहित विकास पाटील** **email :** hinduprakashvarta@gmail.com **website :** www.hinduprakashwarta.com **PRGI No.:** MHMAR/25/A2358 **संपर्क क्र. : 7261999911**